समाविष्ट नसून अद्याप तेथे प्रादेशिक/विकास योजनेचा कोणताही प्रस्ताव मंजूर नाही. त्यामूळे त्या ठिकाणी ब व क वर्ग नगरपरिषदांसाठीच्या मंजूर प्रमाणित विकास नियंत्रण नियमावलीनूसार सद्यस्थितीत विकास वापर अनुज्ञेय आहे.

ज्या अर्थी, मौजे आटगांव, ता.शहापूर, जि.ठाणे येथील सर्व्हे नं.६६/२ब (जुना स.नं.८१/२/१पै) एकूण क्षेत्र ५०३०.०० चौ.मी. या जमिनीवर रहिवास व अंशत: वाणिज्य प्रयोजनासाठी सुधारित बांधकाम परवानगी नकाशास मंजूरीची शिफारस सहाय्यक संचालक नगर रचना ठाणे यांनी उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये केली आहे.

त्या अर्थी, आता महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे निहित करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त जिल्हाधिकारी ठाणे याद्वारे मौजे आटगांव, ता.शहापूर, जि.ठाणे येथील सर्व्हे नं.६६/२ब (जुना स.नं.८१/२/१पै) एकूण क्षेत्र ५०३०.०० चौ.मी. या जमिनीस गांव न.नं.७/१२ चे कब्जेदार सदरी दाखल असलेल्या श्री.अंकुश विठ्ठल अघाव, श्री.बाळकृष्ण अंकुश अघाव व श्री.मोतीलाल सिद्राम जाधव यांना सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे यांनी शिफारस केलेल्या बांधकाम आराखड्यानुसार मौजे आटगांव, ता.शहापूर, जि.ठाणे येथील सर्व्हे नं.६६/२ब (जुना स.नं.८१/२/१पै) एकूण क्षेत्र ५०३०.०० चौ.मी. या जमिनीस रहिवास व अंशत: वाणिज्य या प्रयोजनासाठी सुधारित अकृषिक व बांधकाम परवानगी (अनुज्ञा) खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

<u>त्या शर्ती अशा :-</u>

१. ही परवानगी अधिनियम व त्या खाली केलेले नियम यांना अधिन ठेवून देण्यात आलेली आहे.

२. प्रश्नांधिन जागेची मोजणी ३ महिन्याचे आत करून घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील

३. जागेवर खुले क्षेत्र व रस्ते यांचे क्षेत्र दर्शविणारा फलक लावणे अर्जदार यांचे बंधनकारक राहील.

४. सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांचे क्र. जा.क्र.बिशेप/रेखांकन/बांप/मौ.आटगांव/ता.शहापूर/ससं ठाणे/४१७ दि.२१/२/२०१३ रोजीचे शिफारस पत्र व या कार्यालयाचे क्र.महसुल/कक्ष-१/टे-११/एसआर-२३०/१२ दि.९/५/२०१३ रोजीचे अकृषिक व बांधकाम परवानगीचे आदेश या आदेशाद्वारे निष्प्रभावित करणेत येत आहे.

५. प्रस्तावित बांधकामाचा वापर नकाशांत दर्शविल्याप्रमाणे फक्त रहिवास व अंशत: वाणिज्य वापरासाठीच करण्यात यावा.

६. प्रस्तावित समुह गृहबांधणी योजनेमध्ये खालीलप्रमाणे विकसन प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

| अ. क्र. | इमारत प्रकार | विंग | इमारतीचे मजले | | वापर | अस्तित्वातील बांधकाम क्षेत्र (चौ.मी.) | एकूण प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अस्तित्वात | प्रस्तावित | | | |
| | टाईप-A | A | तळ + ३ | -- | रहिवास | ५१९.६४ | -- |
| | टाईप-A | B, C | -- | तळ + ४ | रहिवास | -- | १८३०.४५ |
| | टाईप-B | D, E, F | -- | तळ + ४ | रहिवास | -- | २०८४.२५ |
| | टाईप-C | G | -- | तळ + ४ | रहिवास | -- | १३४२.१४ |
| | | | | | एकूण | ५१९.६४ | ५७७६.४८ |

७. प्रथमत: रेखांकन प्रस्तावाप्रमाणे जागेवर भूखंड, रस्ते, खुली जागेची प्रत्यक्ष जागेवर प्रथमत: विस्तृत आखणी करुन ती उपअधिक्षक भूमी अभिलेख, शहापूर यांचेकडून मोजणी करुन घेण्यात यावी. आखणी करीत असताना सभोवतालील मंजूर अभिन्यासातील रस्ते व हद्दी यांचेशी योग्य रीतीने समन्वय साधणे आवश्यक आहे. तसेच प्रत्यक्ष मोजणीचे वेळी विषयाधिन जागेचे एकूण क्षेत्रामध्ये तसेच नियोजित भूखंडाचे क्षेत्रामध्ये तफावत आढळल्यास अभिन्यास दुरुस्त करुन अभिलेखाच्या दुरुस्तीसह सुधारीत मंजूरी घेणे तसेच नियोजित बांधकामापासून पुढील, मागील व बाजूची अंतरे प्रत्यक्षात जागेवर सोडणे अर्जदारावर बंधनकारक राहील. त्याशिवाय जागेवर कोणत्याही प्रकारचा विकास करता येणार नाही.